पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ८

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०१/२०१६** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०६/०१/२०१६** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.ननवरे जितेंद्र बाबा
३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
४. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.दुरगुडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंगळे, मा.कांबळे – कार्यकारी अभियंता, मा.बेंडे, मा.बोदाडे - प्रशासन अधिकारी, मा.पानसरे - क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र.४)** एक्स्ट्रीम फिटनेस (Xtrim Fitness) या संस्थेमार्फत स्वस्थ भारत अभियानात सहभागाबाबत - मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.५)** पुणे जिल्हा आंतरकचेरी विविध क्रीडा स्पर्धांसाठी मनपा कर्मचारी खेळाडूंना क्रीडा गणवेश देणेबाबत - मा.जितेंद्र ननवरे, मा.संगीता पवार यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.६)** बो-हाडेवाडी, मोशी येथे महापौर चषक व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करणेबाबत - मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.७)** महापौर चषक जिल्हास्तर ज्युनि.क्रॉसकंट्री स्पर्धा २०१६ आयोजित करणेबाबत - मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ३५ विषय क्रमांक – ०१
दिनांक - ०६/०१/२०१६ विभाग - क्रीडा
सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.संगीता पवार
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७९५/२०१५, दि.१६/१२/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कार्याध्यक्ष ,पुना डीस्ट्रीक्ट इंटरऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन पुणे ४११००२ यांनी १) कॅरम(पुरुष), २) कॅरम (महिला), ३) कबड्डी, ४) फुटबॉल ,५) लॉन टेनिस या ५ क्रीडा स्पर्धां

आर्थिक पुरस्कारासाठी म.न.पा.स दिलेल्या आहेत या स्पर्धांना अनुक्रमे र.रु.२२,७००/-, र.रु.१५,०००/-, र.रु.१४,७००/-, र.रु.२४,३००/- र.रु.२५,०००/- एकूण र.रु.१,०१,७००/- इतका खर्च असून यामध्ये हॉल भाडे, पंचाचे मानधन, विजयी उपविजयी संघांना वैयक्तिक बक्षिसे व चषक फोटोग्राफर उदघाटन व बक्षीस समारंभ ई.चा समावेश आहे.त्यानुसार पुना डीस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन यांच्या विविध क्रीडा स्पर्धांना सन २०१५-१६ करिता म.न.पा.च्या वतीने आर्थिक पुरस्कारदेणेकामी आर्थिक सहाय्य र.रु.र.रु.१,०१,७००/- अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक – ०२

दिनांक - ०६/०१/२०१६ विभाग - क्रीडा

सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.संगीता पवार

संदर्भ : मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७१७/२०१५, दि.२१/१२/२०१५

मा.अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगर पालिका व पिंपरी चिंचवड शहर जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या माहे जानेवारी/फेब्रुवारी २०१६ मध्ये नवमहाराष्ट्र विद्यालय मैदान, पिंपरी वाघेरे येथे महापौर चषक राज्यस्तर कुस्ती स्पर्धा २०१६ आयोजित करणेस त्याकामी येणा-या खर्च र.रू.३५,००,०००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व ट्रॉफीज,सन्मानचिन्हे, पी.व्हि.सी.फ्लेक्सबॅनर्स, क्रीडा साहीत्य इ.खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस व सदर खर्चातील मैदान तयार करणे, स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या व्यवस्था, गॅलरी खर्च, गाद्या, उशा, बेडशिट, चादर, बादली, मग इ.भाडे खर्च र.रु.१०,९०,०००/- हा स्थापत्य विभाग, ड क्षेत्रीय कार्यालय व विद्युत, स्पिकर, माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.८,००,०००/- हा विद्युत, विभाग, ड क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस, उर्वरित खर्च र.रु.१६,१०,०००/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७ विषय क्रमांक – ०३

दिनांक - ०६/०१/२०१६ विभाग - क्रीडा

सुचक : मा.संगीता पवार अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/७९८/२०१५, दि.२८/१२/२०१५

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व पुणे जिल्हा बुध्दीबळ सर्कल यांचे मान्यतेने पिंपरी चिंचवड महानगर चेस असोसिएशन, चिंचवड पुणे ३३ यांचे सहकार्याने दिनांक २० ते २१ फेब्रुवारी २०१६ या काळात मनपाचे संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी पुणे २६ येथे महापौर चषक जिल्हास्तर बुध्दीबळ स्पर्धा २०१५-१६ आयोजित करणेस व ट्रॉफीज, मेडल्स, सन्मानचिन्हे, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर्स, इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व सदर खर्चातील

स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या, मॅट/चटई व्यवस्था, टेबल १०० नग, खुच्या ४०० नग करीता र.रु.५०,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग ई क्षेत्रीय कार्यालय व विद्युत स्पिकर, माईक व जनरेटर व्यवस्था करीता र.रु.५०,०००/- हा खर्च विद्युत विभाग ई क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.१,९१,९५०/- हा खर्च महापौर चषक विविध क्रीडास्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३८ विषय क्रमांक – ०४

दिनांक - ०६/०१/२०१६

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कुपोषित मुले, खेळाडू, नागरिकांसाठी स्वस्थ भारत अभियान अंतर्गत एक्स्ट्रीम फिटनेस (Xtrim Fitness) या संस्थेचा प्रस्ताव मागवून संयुक्तरित्या अभियान राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक – ०५

दिनांक - ०६/०१/२०१६

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.संगीता पवार

संदर्भ : मा.जितेंद्र ननवरे, मा.संगीता पवार यांचा प्रस्ताव -

पुणे जिल्हा आंतर कचेरी क्रीडा स्पर्धातर्गत विविध क्रीडा स्पर्धांचे (क्रीकेट, व्हॉलीबॉल, अथलेटीक्स, कबड्डी, कॅरम, टेबलटेनिस) आयोजन करणेत आलेले असून त्यामध्ये मनपा कर्मचारी संघ सहभागी होत आहे. सदर मनपा कर्मचारी खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी क्रीडा गणवेश (ट्रॅकसुट, शॉर्ट, टीशर्ट, पॅन्ट, बुट, कीटबॅग इ.) साहित्य तातडीने पुरवठा करणेस व त्याकामी येणारे खर्चास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४० विषय क्रमांक – ०६

दिनांक - ०६/०१/२०१६

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव -

बो-हाडेवाडी मोशी ( प्रभाग क्र.६) या ठिकाणी महानगरपालिकेच्या आरक्षित जागेवर महापौर चषक व्हॉलीबॉल ( जिल्हास्तरीय ) स्पर्धांचे आयोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१ विषय क्रमांक – ०७

दिनांक - ०६/०१/२०१६

सुचक : मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.जितेंद्र ननवरे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, नेहरु युवा केंद्र संगठण, पुणे जिल्हा अथलेटिक्स असो.यांच्या मान्यतेने माहे जाने./फेब्रु. २०१६ मध्ये महापौर चषक जिल्हास्तर ज्युनि. क्रॉसकंट्री स्पर्धा २०१६ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.५,००,०००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य
व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/८/२०१६
दिनांक : ०७/०१/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.